# आठवणींच्या दुर्बिणीतून...

- डॉ. जयंत नारळीकर

डॉ. जयंत नारळीकर यांचा खगोलशास्त्रज्ञ म्हणून आपणा सर्वांना परिचय आहेच. पण त्यांच्या आठवणींची दुर्बीण जेव्हा मागे वळून बालपणाकडे पाहू लागते, तेव्हा बालपणच्या 'मधुर मनोहर, अतीव सुंदर आठवणी' जाग्या होतात. त्या वाचत असताना त्यांच्यातला शास्त्रज्ञ, साहित्यिक आणि मुख्य म्हणजे 'माणूस' नकळत कसा घडत गेला, हे उलगडत जाते.

आपण दुर्बिणीतून विश्वाचे निरीक्षण करतो, तेव्हा आपल्याला भूतकाळाचे दर्शन घडते. दुर्बिणीला कॅमेरा जोडून आपण एखाद्या ताऱ्याचे बिंब फिल्मवर उमटवतो ते बिंब ताऱ्याचे 'आज'चे नसते. जर तो तारा १० प्रकाशवर्ष अंतरावर असेल तर ते बिंब असते दहा वर्षांपूर्वीचे. कारण प्रकाशाला ताऱ्यापासून आपल्यापर्यंत यायला दहा वर्षे लागतात. अर्थात आपण जितक्या लांबचे वेध घेऊ तितकीच ही चित्रे सुदूरभूतातली असतात आणि वाढत्या अंतरानुसार धूसर होत जातात. तरी पण काही तेजस्वी स्रोत अशा धूसर पटलावर ठळकपणे चमकतात.

आठवणींचेही असेच असते. सुदूरभूतातल्या आठवणी सामान्यपणे पुसट होत जातात. पण त्यांतही काही मानसपटलावर आजही स्पष्टपणे घर करून असतात. अशाच काही आठवणी माझ्या लहानपणीच्या ... मधुर, मनोहर, अतीव सुंदर ...

***

**''मधुर मनोहर अतीव सुंदर यह सर्व विद्या की राजधानी.''**

बनारस हिंदू युनिव्हर्सिटीचे हे 'कुलगीत', औपचारिक समारंभात गायले जाणारे. माझे लहानपण याच विद्यापीठाच्या रम्य आवारात गेले. माझे वडील विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक आणि विभाग-प्रमुख होते. माझी आई संस्कृत घेऊन एम. ए. झालेली. दोघांनाही वाचनाची आवड, त्यामुळे घरात पुस्तकांची रेलचेल. खोल्यांच्या भिंती पुस्तकांच्या कपाटांनी व्यापलेल्या. ती पुस्तके वाचण्याचे वय होण्यापूर्वीच माझा अशा एका कपाटाशी 'घनिष्ट' संबंध आला.



**डावीकडे जयंत नारळीकर उजवीकडे अनंत नारळीकर**

शाळेत जाण्यापूर्वीचे ते वय. मी आणि माझा धाकटा भाऊ अनंत फरशीवर गादी टाकून लांब उडीचा सराव करीत होतो. उत्साहाच्या भरात मी उडीचा उच्चांक ओलांडला आणि गादी ओलांडून माझा एक पाय जवळच्या कपाटाच्या काचेत घुसला किंवा दाराची काच पायात घुसली असे म्हणणे अधिक योग्य ठरेल ! त्या काचेची खूण अद्याप पायावर आहे. आणि काचेचे तुकडे पायातून काढताना डॉक्टरनी दुखवलेले आजही स्मरणात आहे. पुस्तकांशी जवळीक पायाने नव्हे डोक्याने साधायची असते याची जाणीव तेव्हापासून सुरू झाली असावी.

***

अशीच एक लहानपणची आठवण आहे. विद्यापीठाच्या 'स्पेशल कॉन्वोकेशनची', ज्यासाठी महात्मा गांधी आणि पंडित नेहरू खास पाहुणे म्हणून

वळून बघता क्षणभर मागे स्मरले क्षण ते खास
आठवणीतून घमघमला अन् बालपणाचा वास



कोणत्याही कामात विवेक अन् सजगता यांचे भान ठेवा - डॉ. रसिक शेटिया, कोमल नर्सिंग होम, विश्रांतवाडी, पुणे

निमंत्रित होते. हा समारंभ ज्या ठिकाणी होणार होता ती जागा मी व माझा भाऊ 'दौडो दौडो' म्हणून ओळखायचो. कारण इथे स्टेडियमवजा लांबच्या लांब पायऱ्या होत्या, ज्यावर लोक समारंभाच्या वेळी बसत. एरवी ह्या मोकळ्या पायऱ्यांवरून पळायला (दौड मारायला) आई आम्हाला घेऊन येत असे.

मात्र, त्या दिवशी खास दीक्षांत समारंभासाठी अलोट गर्दी उसळली होती. 'नारेबाजी' पण चालू होती. पोलिसांच्या गाड्या होत्या. 'इन्किलाब जिंदाबाद' चा नारा आम्हाला चांगला परिचयाचा होता. ते सर्व वातावरण पाहून आई म्हणाली, ''चला घरी जाऊ - कोण जाणे दंगा झाला, पळापळ झाली तर.''

''पण आम्हाला नेहरू - गांधी पाहायचेत ना'' आमचा घोषा चालू होता. अखेर बाहेर जाता जाता स्टेजजवळून आईने फिरवले. गांधीजी दिसले नाहीत पण गाऊन घातलेले व डोक्यावर गांधी टोपी असलेले 'नेहरू' पाहिले. प्रत्यक्ष नेहरूंना पाहाण्याचा हा पहिला व अखेरचा प्रसंग ठरला.आठवणींच्या सुदूरभूतात नेहरूंची ती छबी टिकून राहिली एवढे खरे.

***

त्याहून ठळक आठवण आहे एका ऋषीतुल्य महापुरुषाला जवळून पाहिल्याची. माझे वय दहाच्या आसपास असावे. विद्यापीठात एकेकाळी कुलगुरू असलेले डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन् काही कामासाठी विद्यापीठाला भेट देत होते. त्यांना आमच्या घरी रात्रीच्या भोजनासाठी बोलावले होते. त्यांच्या बरोबर २५-३० लोकांना आमंत्रित केले होते. जेवणापूर्वी सर्व आमंत्रित लोक आमच्या घरच्या सिमेंट काँक्रीटच्या बॅड्मिंटन कोर्टवर गप्पा मारत होते. इतक्यात त्यांच्या कानावर लांबून उमटलेले संस्कृत स्वर पडले :-

**'न भूमिर्न तोयं न तेजो न वायुः नखं**
**नेन्द्रियं वा न तेषां समूहः।**
**अनैकान्तिकत्वात्सुषुप्तैकसिद्धः**
**तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोयम्।।'**

शंकराचार्यांची दशश्लोकी, आकाशवाणीप्रमाणे हवेतून येत होती. ही ग्रामोफोन रेकॉर्ड होती का? राधाकृष्णन्सह सर्व अतिथी संभाषण थांबवून तन्मयतेने ऐकत होते.

ही योजना वडिलांची होती. आम्हा दोघांचे संस्कृत पाठांतर बरेच होते. त्यांतून दशश्लोकी निवडून सुस्वर चालीवर म्हणायचा सराव त्यांनी आमच्याकडून करवून घेतला होता. डॉ. राधाकृष्णन् - सारख्या तत्त्वज्ञानी व्यक्तीचे अशा तऱ्हेने स्वागत व्हावे ही त्यांची इच्छा ! त्यासाठी अर्थात् दिग्दर्शनाचे काम केले होते आईने.

डॉ. राधाकृष्णन्सह सर्व निमंत्रितांनी आमची पाठ थोपटली, तेव्हा त्या परिश्रमाचे चीज झाले असे वाटले.

***

आमच्या घरी अनेक विद्वज्जनांचे येणे-जाणे असे. काही विद्यापीठात परीक्षक म्हणून येत, तर काही आपल्या मुलामुलींना प्रवेश मिळाल्यावर पोहोचवण्यासाठी येत, तर काहींचे काशीयात्रेसाठी आगमन होई. गणितज्ञांपैकी दिल्लीतले प्रा. राम बिहारी (जे प्रख्यात 'घंटीवाला'च्या दुकानातून मिठाईचा पेटारा आणत.), गौहाटीतून प्रा. थवानी (ज्यांचे किस्से व कोडी आम्हाला गुंतवून ठेवत) तर दक्षिणेतून कडक सोवळे पाळून स्वतःचा स्वैपाक स्वतः करणारे प्रा. वैद्यनाथ स्वामी, महाराष्ट्रातून रँग्लर परांजपे व रँग्लर महाजनी ज्यांना आमचे वडील गुरुतुल्य आदराने वागवीत, लेखकांत मा. दा. अळतेकर व ना. सी. फडके,हिंदी साहित्यिकांत बेढब बनारसी (कृष्णदेव प्रसाद गौड) व शिवमंगल सिंह 'सुमन', संस्कृतात वार्तालाप करणारे चिन्नस्वामी शास्त्री तर हिंदी-संस्कृतच्या काव्य-शास्त्र विनोदात रमवणारे ब्रजमोहन व्यासजी !

पण आम्हा दोघा भावांच्या चांगले लक्षात राहतील ते प्रख्यात संगीतकार आणि विष्णु दिगंबर पलुस्करांचे शिष्य पं. नारायणराव व्यास !

आम्ही त्यांना 'व्यासमामा' म्हणत असू. वडिलांपेक्षा अनेक वर्षांनी मोठे. दोघांचा अनेक वर्षांचा जिव्हाळा. बनारसमध्ये हिंदुस्तानी संगीताचा बराच बोलबाला असल्याने प्रख्यात

आठवणींना गंध लाभता भावफुलांचा
मनास मिळतो आनंद पाहा, पुनःप्रत्ययाचा

कै. व.पु. काळे यांच्या स्मृतीस
विनम्र अभिवादन !
प्रायोजक : संजय बर्वे, पुणे

संगीतज्ञांच्या मैफली होत. त्यासाठी व्यासमामा अधूनमधून येत. त्यांचे किस्से व गमतीदार नकला हे आमचे प्रमुख आकर्षण.


पण अशाच एका भेटीत व्यासमामांनी आमच्या आई-वडिलांनाच धारेवर धरले. ''जयंत-अनंत शिस्तीत अभ्यास केव्हा करतात ? स्वत:ची कामे स्वत: करायची सवय त्यांना तुम्ही केव्हा लावणार ? सर्व बाबतींत आईवर विसंबून राहून कसे चालेल? त्यांना स्वावलंबन आले पाहिजे.''

वर्गात वरचे नंबर येत असल्याने आई-वडिलांनी अभ्यासाचे वेळापत्रक असे करून राबवले नव्हते, पण आता व्यासमामांनी बौद्धिक घेतल्यामुळे त्यांनी फतवा काढला. ''रोज सकाळी पाचला उठायचे आणि वेळापत्रक करून शाळेत जाण्यापूर्वी घरी तीन तास अभ्यास झाला पाहिजे.''

तिकडे व्यासमामांनी आम्ही कुठली कामे स्वत: करायची यावर सविस्तर भाष्य केले. आणि तेव्हापासून आम्ही स्वावलंबन आचरणात आणायचा प्रयत्न करू लागलो. त्यावेळी 'हे काय नवीन झेंगट आले' असे वाटले तरी पुढील आयुष्यात ते स्वावलंबन आवश्यक आणि उपयोगी ठरले.

***

वडिलांनी आमच्यासाठी, दोन काळे फळे, भिंतीवर तयार करवले. आम्ही त्यांचा उपयोग




चित्रे काढण्यासाठी किंवा भूगोलातील नकाशांसाठी करीत होतो. पण मी आठवीत असताना माझे मामा मोरेश्वर हुजूरबाजार आमच्या घरी राहायला आले व त्यांनी एक नवीन प्रघात सुरू केला. ते स्वत: गणिताच्या एम.ए.च्या शिक्षणासाठी बनारसला आले होते. गणित त्यांच्या रक्तात भिनले होते. त्यांनी फळ्यांवर माझ्यासाठी गणिती कूटप्रश्न लिहायला सुरुवात केली. "Challenge Problem for JVN" – अशा शीर्षकाखाली ही गणिती आव्हाने असत. मी ती सोडवेपर्यंत किंवा पराजय कबूल करेपर्यंत ही आव्हाने पुसायची नाहीत, असा प्रघात चालू झाला. त्या प्रश्नमालिकेतून मला गणिताच्या विविधरंगी रूपांचे मनोहारी दर्शन झाले. शाळेत असतानाच मी कॉलेजमध्ये शोभतील अशी गणिते सोडवू लागलो.

मोरूमामांना गणिताप्रमाणे संस्कृत-आणि क्रिकेट यांत रस होता. क्रिकेटमध्ये काहीही घडू शकते या तथ्याला अनुसरून मामांनी फळ्यांचा एक वेगळाच उपयोग करायला सुरुवात केली. १९५३ मध्ये इंग्लंड-ऑस्ट्रेलिया टेस्टमालिका इंग्लंडमध्ये चालू होती आणि तिची कॉमेंटरी रेडिओवर ऐकायला मिळे. खेळ रात्री ११ पर्यंत चाले, पण (सकाळी ५ ला उठायचे असल्याने) मी ९ वाजताच झोपायला जाई. पुढल्या दोन तासांत काय घडले? ऑस्ट्रेलिया एक बाद ५१ वरून एक बाद १५१ ला पोहोचले का ५ बाद १३० ला? मोरूमामा दोन पर्यायी स्कोअर लिहून ठेवत आणि मला कळत नसे यातील खरा स्कोअर कुठला.

संस्कृत भाषेचा लवचिकपणा आणि शब्दसामर्थ्य दोन्हींचा परिचय मोरूमामांशी झालेल्या चर्चेतून मला झाला असे म्हणायला हरकत नाही व संस्कृतातून 'पी. जे.' पासून उत्तम कोट्या कशा कराव्यात याचा मला अनुभव आला. मात्र, आईने मुद्दाम शिकवलेल्या श्लोकांचा आणि कालिदास - भवभूती प्रभृतींच्या वाङ्मयाचा अभ्यास मला शाळेतल्या अंताक्षरीसाठी उपयोगी पडला. आमच्या आणि आमच्या वरच्या वर्गात संस्कृत श्लोकांच्या भेंड्या अख्ख्या शाळेच्या उपस्थितीत झाल्या, तेव्हा आमचा वर्ग जिंकला आणि त्यामागे ऐंशी टक्के वाटा माझ्या एकट्याचा होता. स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून

अहा ते सुंदर दिन हरपले
मधुभावांचे वेड जयांनी जिवाला लाविले

कै.शांता शेळके यांच्या स्मृतीस
विनम्र अभिवादन !
प्रायोजक : राहुल भिडे, पुणे

आलेले (१३ विषयांत एम. ए. केलेले) पंडित रामकुमार चौबे यांनी दिलेली शाबासकी अजून स्मरणात आहे. त्यांनी मला रघुवंशातले काही श्लोक मुद्दाम म्हणायला सांगितले.

***

पुस्तकांपासून सुरू केलेले हे अतीतवेध पुस्तकांनीच संपवतो. लहानपणी आम्हाला अनेक गोष्टी सांगणाऱ्या आईने मराठी, हिंदी व इंग्रजी वाङ्मयातून पुष्कळ काही वाचून सांगितले. हरी नारायण आपटे व नाथ माधव यांच्या कादंबऱ्या, हिंदीतून 'चंद्रकांता' तर इंग्रजीतून पी. जी. वुडहाऊस. पुढे आम्ही दोघे आईने गोष्ट सांगायची वाट न पाहता स्वतःच वाचायला लागलो.

अर्थात् ही वाचनाची आवड वडिलांचा वारसा म्हणायला हरकत नाही. त्यांच्या बरोबर गावात गेलो की पहिला स्टॉप पुस्तकांच्या दुकानाचा. वडिलांनी एखादे तत्त्वज्ञानाचे पुस्तक निवडले की त्याच वेळी आम्ही काही गोष्टींची पुस्तके पण विकत घेण्यासाठी पुढे करत असू आणि वडिलांनी नकार दिल्याचे आठवत नाही. मात्र, एकदा परीक्षा जवळ आलेली असताना विकत घेतलेल्या रहस्यकथा परीक्षा संपेपर्यंत वाचायच्या नाहीत ही बंदी आईने अमलात आणली.

पन्नास वर्षे उलटली तरी या आठवणी मनात ताज्या आहेत. 'ते हि नो दिवसा गताः' असे म्हणताना आज वाटते की आजच्या किशोर-कुमारांपेक्षा आम्ही किती नशीबवान् होतो ! शाळा सुरू होण्यापूर्वी आणि संपल्यावर बाहेरच्या 'क्लासेसना' जाण्याचे ते दिवस नव्हते. चढाओढ होती, पण तिचे अवास्तव दडपण मनावर नव्हते. शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी पालकांवर दडपण नसे. फॉर्म मिळवण्यासाठी लांब रांगा नसत. घरातून दहा - पंधरा मिनिटांत रमत गमत शाळा गाठता येत असे. स्कूलबससाठी थांबून तासभर प्रवास करून शाळा गाठण्याचे ते दिवस नव्हते किंवा तीन-आसनी रिक्षांचे त्यांत १२ मुले कोंबून 'ब्लॅक होल' झालेलेही पाहायला मिळत नसे.

आठवणींच्या दुर्बिणीतून दिसणारे माझे बालपणीचे विश्व पाहून जाणवते, मी किती नशीबवान् होतो की मला असे बालपण लाभले.

❇❇

**डॉ. जयंत नारळीकर**
'आयुका', पुणे - ४११ ००७.